
**II Om Ganeshaya Namah II**






| Distances and Routes from Pune to Ashtavinayak | | | |
|---|---|---|---|
| **From** | **To** | **Distance** | **Route via** |
| Pune | Theur | 25 km. | Pune-Hadapsar-Loni-Theur |
| Theur | Moregaon | 70 km. | Loni-Yavat-Supa-Moregaon |
| Moregaon | Siddhatek | 65 km. | Supa-Choufula-Patas-Daund-Siddhtek |
| Siddhatek | Rajangaon | 92 km. | Daund-Kashti-Belvandi-Shirur-Rajangaon |
| Rajangaon | Ozar | 100 km. | Shikrapur-Chakan-Rajgurunagar-Narayangaon-Ozar |
| Ozar | Lenyandri | 15 km. | Ottur-Lenyandri |
| Lenyandri | Mahad | 134 km. | Junnar-Narayangaon-Manchar-Rajgurunagar-Chakan-Wadgaon-Lonvala-Khopoli-Mahad |
| Mahad | Pali | 42 km. | Khopoli-Pali |
| Pali | Pune | 111 km. | Khopoli-Lonavla-Wadgaon-Pune |


By: AVKS, SUPPORT TEAM


अष्टविनायक दर्शन
नकाशा




*अष्टविनायक नकाशा

|| थेऊरचा श्री चिंतामणी ||


श्री चिंतामणी

पुणे–सोलापूर हमरस्त्यावरून थेऊर गावाला जाण्यासाठी एक फाटा फुटतो.तेथुन सुमारे चार–पाच कि.मी अंतरावर मुळा–मुठा नदिच्या काठी थेऊर येथील श्री चिंतामणी गणेशाचे मंदिर आहे.मंदिराचे आवार प्रशस्त असून सभामंडप लाकडी आहे.मूर्ती पूर्वाभिमुखी व डाव्या सोंडेची आहे.मंदिराच्या आवारात ओवऱ्या आहेत. मंदिरापासून नदिकाठापर्यंत दगडी पायऱ्यांचा रस्ता आहे.श्रीमंत माधवराव पेशवे नेहमी येथे येत असत.देवाची सेवा करण्यासाठी राहता यावे म्हणून त्यांनी शेजारीच एक वाडा बांधला होता.मंदिरातील एका ओवरीत बसून चिंतामणीकडे पाहता श्रीमंत माधवरावांनी येथेच देह त्याग केला.त्यांच्या पत्नी रमाबाई त्यांच्याबरोबर सती गेल्या. नदिकाठी त्यांची समाधी आहे.रमाबाई वृंदावनही येथेच आहे.

पुणे–थेऊर अंतर २० कि.मी आहे.पुणे शहरातून बस सेवा उपलब्ध आहे.




|| मोरगावचा मयूरेश्वर ||


मयूरेश्वर

पुणे–बारामती रस्त्यावर कऱ्हानदिच्या परीसरात असलेल्या येथील गणपतीला ' मयूरेश्वर ' असे म्हणतात.मंदिराभोवती दगडी तटबंदी आहे. आवारात भव्य दिपमाळा आहेत.चार कोपऱ्यात चार मिनारी खांब आहेत.भव्य आकाराचा दगडी नंदी चौथऱ्यवर विराजमान आहे.गणेसमूर्ती कलाकुसर केलेल्या मखरात असून मस्तकावर लहान नागफणाकृती आहे.गणेशाच्या डोळ्यांत व नाभिमध्ये हिरे बसवलेले दिसतात.मंदिराला दोन प्रवेशव्दार आहेत.सभामंडपाभोवती अष्टगणेश मूर्ती.श्री गणेशाने मोरावर बसून कमलासुर राक्षसाचा वध केला म्हणून त्याला मयूरेश्वर नाव पडले.

१) पुणे–मोरगाव अंतर ६४ कि.मी आहे.

२) जेजूरी–मोरगाव अंतर १७ कि.मी आहे.

पुणे–बारामती एस.टी.बस मोरगावला थांबतात.तसेच जेजूरी वरून खाजगी वाहणेउपलब्ध.




*अष्टविनायक नकाशा

|| सिध्दटेकचा सिध्दीविनायक ||


सिध्दीविनायक

नगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात सिध्दटेक या

लहानशा गावी अष्टविनायकाचे हे मंदिर वसले आहे.

या गणपतीला सिध्दीविनायक असे म्हणतात.

श्री विष्णूने एकाक्षर मंत्राने श्री गणेश प्रार्थणा

करुन सिध्दी मिळविली,म्हणून याचे नाव

सिध्दीविनायक.साप्रत मंदिर पेशवेकालीन असून

मूर्ती स्वयंभू पाषाणावर विराजमान आहे.

मूर्ती गजमूख उजव्या सोंडेची आहे.

सभामंडप बडोद्याच्या मैराळांनी बांधला.

येथेच शिवाई, विष्णू आणि महादेवाचे मंदिर

देखील आहे.भीमानदिच्या तीराावर सुंदर घाट

बांधला आहे.भाद्रपद आणि माघ महिन्यात येथे

उत्सव साजरा होतो.

भाविकांसाठी येथे धर्मशाळेची सुविधा आहे.

१) पुणे–सिध्दटेक ९९ कि.मी.

२) दौड–सिध्दटेक २० कि.मी.

३) श्रीगोंदा–सिध्दटेक ५० कि.मी.

दौड येथून एस.टी.बससेवा उपलब्ध असते.




*अष्टविनायक नकाशा

|| रांजणगावचा महागणपती ||


महागणपती

रांजणगावचा महागणपती,पुणे जिल्ह्यात पुणे–अहमदनगर राजमार्गावर आहे. मंदिर सुमारे एक हजार वर्षापूर्वीचे असावे असे म्हणतात.इंदूरचे सरदार किबे यांनी सभामंडप बांधला.माधवराव पेशव्यांनी मंदिराचे दोन्ही गाभारे बांधले.गणेशाची मुर्ती रेखीव असून सोबत ऋध्दीसिध्दी आहेत.हा गणेश उजव्या सोंडेचा आहे.उत्तरायण आणि दक्षिणायनाच्या मध्यकाळात सूर्यकिरण मूर्तीवर पडून मूर्तीचे सौंदर्य उठून दिसते.येथेच पाण्याची एक मोठी विहीर देखील आहे.

पुणे–रांजणगाव अंतर ५० कि.मी आहे.पुणे–नगर मार्गावर सर्व एस.टी. बस थांबतात.पुण्याहून येथे जाणे सोईचे आहे.

## अष्टविनायक क्षेत्रे




*अष्टविनायक नकाशा

### || ओझरचा विघ्नेश्वर ||


विघ्नेश्वर

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात ओझर या गावी अष्टविनायकाचे हे मंदिर कुकडीनदितीरा वर वसले आहे.या गणपतीला विघ्नेश्वर असे म्हणतात.मंदिर पूर्वाभिमुख असून त्याला दगडी तटबंदि आहे.येथे दोन दीपमाळा आहेत.मंदिराल सलग तीन सभामंडप असून गाभाऱ्याला चार दिशांना पंचायनातील मूर्ती आहेत.गणेशाची मुर्ती पुर्णाकृती,आसनमांडी घातलेली,उजव्या सोंडेची,भव्य आणि तेजस्वी आहे. मूर्तीच्या भालप्रदेशावर आणि दोन्ही डोळ्यांत हिरे बसविलेले आहेत.

चिमाजी आप्पांनी मंदिराचा जीर्णोध्दारकेला.

भाविकानसाठी भक्तिभवन व धर्मशाळा येथे उतरण्याची सोय आहे.

१) पुणे–ओझर ७५ कि.मी.

२) नारागाव–ओझर ८ कि.मी.

नारायण गावला उतरून तेथून नारायणगाव–ओझर एस.टी.बसने ओझरला जाता येते.खाजगी वाहणे सुध्दा उपलब्ध असतात.




* अष्टविनायक नकाशा

|| लेण्याद्रिचा गिरीजात्मज ||



गिरीजात्मज


अष्टविनायकाचे हे एकमेव स्थळ डोंगरात आहे. जुन्नर तालुक्यात लेण्याद्री डोंगरात आहे. २७५ पायऱ्या चढल्यानंतर आपण मंदिराजवळ येतो. मूळचे हे बैध्द लेणे असल्याने अखंड शिळेतून कोरलेले तीन खांबांचे प्रशस्त दालन आहे.मूर्ती खडकात कोरलेली असल्याने येथे प्रदक्षिणा घालता येत नाही.मूर्तीचा आकारअस्पष्ट असून येथे मुखदर्शन होत नाही.भाविक पाठीची पूजा करतात.मंदिराच्या परिसरातून आसपासचे सृष्टीसौंदर्य व शिवनेरी किल्ल्याचे दृश्य मोठे सुंदर दिसते.या गुंफेतील गणेशाला गिरीजात्मज असे म्हणतात. पायथ्यापर्यन्त पक्का रस्ता आहे.पुजाऱ्यांच्या घरी भोजन–निवासाची व्यवस्था होऊ शकते.चतुर्थीला भाविक येथे मोठ्या संखेने येतात.

पुणे–जुन्नर–लेण्याद्री ९० कि.मी आहे.

पुण्याहून लेण्याद्रीसाठी सकाळी ७ वाजता थेट लेण्याद्रीपर्यन्त जाणारी एस.टी.बससेवा उपलब्ध असते.




* अष्टविनायक नकाशा



|| महडचा वरद विनायक ||

पुणे –मुंबई महामार्गावर रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात महड या लहानशा गावी अष्टविनायकचे हे स्थान असून त्याला वरद विनायक असे म्हणतात.मंदिराला दोन सभामंडप असून ते कौलारू घरासारखे दिसतात.मुख्य मंदिर कोरीव दगडाचे असून गाभाऱ्यात नक्षीदार महिरप असले ल्या दगडी सिंहासनावर मूर्ती आसनस्थ आहे.


मूर्ती डाव्या सोंडेची आहे.मंदिरामागे मोठे तळे असून त्यात कमळपुष्पे उमललेली दिसतात. येथील वैशिष्ट्य म्हणजे १८९२ पासून नंदादिप अखंड तेवत ठेवलेला आहे.

१) पुणे–खोपोली–महड ८० कि.मी.
२) मुबई–महड ९० कि.मी.
३) खोपोली–महड ६ कि.मी.
पुणे–मुंबई मुख्य मार्गापासून आतमध्ये २ कि.मी.वर गाव आहे.येथे निवास व्यवस्था उपलब्ध नाही.परंतु खोपोली जवळच असल्याने येथे मुक्काम करण्याचा प्रश्न येत नाही.




*अष्टविनायक नकाशा

|| पालीचा बल्लाळेश्वर ||


बल्लाळेश्वर

पाली येथील,आठव्या विनायकाला बल्लाळेश्वर असे म्हणतात.मंदिराची बांधणी चिरेबंदी दगडाची असून त्याला दोन प्रशस्त सभामंडप आहेत.गाभाऱ्यात दगडी सिंहासनावर डाव्या सोंडेची ३ फूट उंच असलेली गणेशमूर्ती आहे.मूर्तीमागे चांदीचा प्रभावळ असून मखर उत्तम नक्षीदार केलेली आहे.

माघ महिन्यात येथे मोठा उत्सव असतो.

मंदिर परीसरात गरम पाण्याचे झरे,सुधागड किल्ला ही स्थळे पाहाण्यासारखी आहेत.

१) मुंबई–पाली १४० कि.मी.

२) पुणे–खोपोली–पाली १११ कि.मी.

३) खोपोली–पाली ३८ कि.मी.

पुणे–खोपोली,मुंबई येथून पालीसाठी एस.टी.बस सेवा उपलब्ध असते.

येथील रेस्ट हाऊसमधे मुक्कामाची व्यवस्था होऊ शकते.